आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ मे २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वाराणसीमधून भरला उमेदवारी अर्ज

- मुंबईत घाटकोपर परिसरात पत्र्याचं होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा १४ वर पोहोचला, ४३ जण जखमी

- युनेस्कोच्या मेमरी ऑफ वर्ल्ड आशिया पॅसिफिक रिजनल रजिस्टरमध्ये भारताच्या रामचरितमानस, पंचतंत्र आणि सहृदयलोक-लोकाणा या ग्रंथांची नोंद

**आणि**

- भीमा कोरेगाव प्रकरणातले आरोपी गौतम नवलखा यांना जामीन मंजूर

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. अर्जांची छाननी उद्या होणार असून अर्ज मागे घेण्याची तारीख १७ मे आहे. सातव्या टप्प्यात ५७ लोकसभा मतदारसंघासाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात ७ राज्य आणि एका केंद्रशासीत प्रदेशात मतदान होईल. यामध्ये उत्तर प्रदेश आणि पंजाबमधल्या प्रत्येकी ७, पश्चिम बंगामधील ९, बिहारमधील ८, ओडीशातील ६, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडमधील ३ आणि चंदीगढ केंद्रशासीत प्रदेशातल्या एका जागेसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या आधी त्यांनी विविध मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेतलं. उमेदवारी अर्ज दाखल करतांना त्यांनी वाराणसीत मोठा रोड शो आयोजित करुन शक्तीप्रदर्शन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी वाराणसीमधून तिसऱ्यांदा आपला उमेदवारी अर्ज भरत आहेत. वाराणसीत सातव्या टप्प्यात १ जून रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

देशात चौथ्या टप्प्यातल्या निवडणूकीत काल ९६ मतदारसंघासाठी ६७ टक्के मतदान झालं. एकूण ९ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात मतदान झालं. आंध्र प्रदेशात ७८ पूर्णांक ५ दशांश टक्के मतदान झालं. बिहारमध्ये ५७ पूर्णांक ६ दशांश टक्के, तेलंगणा ६४ पूर्णांक ९३, जम्मू काश्मिर ३७ पूर्णांक ९८, झारखंड ६५ पूर्णांक ३१ शतांश टक्के, मध्य प्रदेश ७० पूर्णांक ९८ शतांश टक्के, ओडीशा ७३ पूर्णांक ९७ शतांश टक्के, उत्तर प्रदेश ५८ पूर्णांक ५ दशांश टक्के तर पश्चिम बंगालमध्ये ७८ पूर्णांक ४४ शतांश टक्के मतदान झालं. आंध्र प्रदेशात काल विधानसभेसाठीही मतदान झालं. चौथ्या टप्प्याच्या मतदानानंतर देशात लोकसभा निवडणूकीच्या एकूण ३९७ मतदारसंघामध्ये मतदान झालं आहे. अरूणाचल प्रदेश, सिक्किम, आंध्र प्रदेश आणि ओदिशा या राज्यांच्या विधानसभेसाठीही मतदान पूर्ण झालं आहे. मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यात राज्यात काल अंदाजे सरासरी ५९ पूर्णांक ६४ टक्के मतदान झालं. राज्यातल्या एकूण ११ संघांपैकी बीड मतदासंघात सर्वाधिक ६९ पूर्णांक ७४ शतांश टक्के मतदान झालं असून सर्वात कमी मतदान पुणे मतदारसंघात झालं आहे. पुण्यात केवळ ५१ पूर्णांक २५ शतांश टक्के मतदान झालं. राज्यातील इतर मतदारसंघात झालेलं मतदान पुढील प्रमाणे -

जळगाव - ५३ पूर्णांक ६५ शतांश टक्के, रावेर - ६१ पूर्णांक ३६ शंताश टक्के, जालना - ६८ पूर्णांक ३० शंताश, औरंगाबाद - ६० पूर्णांक ७३ शंताश, मावळ - ५२ पूर्णांक ९० शतांश, शिरूर - ५१ पूर्णांक ४६ शतांश, अहमदनगर - ६२ पूर्णांक ७६ शतांश, शिर्डी - ६१ पूर्णांक १३ तर नंदुरबारमध्ये - ६७ पूर्णांक १२ शतांश टक्के मतदान झाल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे.

**<><><><><>**

मुंबईमध्ये येत्या २० मे रोजी लोकसभा निवडणुकांसाठी मतदान होणार असून या दिवशी दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांच्या वैयक्तिक गरजेनुसार मुंबई जिल्हा निवडणूक प्रशासन सुविधा उपलब्ध करून देणार आहे. या सुविधा मिळवण्यासाठी मतदारांनी सक्षम ॲपवर आपल्या विशिष्ट मागण्या नोंदवाव्यात असं आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केलं आहे. सक्षम ॲपवर नोंदणी करणाऱ्या मतदारांना त्यांच्या मागणीनुसार मतदानाच्या दिवशी वाहतूक व्यवस्था, व्हील चेअर, सहाय्यक यासारख्या सुविधा पुरवल्या जातील असं त्यांनी सांगितलं. तसंच ज्या मतदारांना सक्षम मोबाईल ॲपवर आपल्या मागण्या नोंदवता आल्या नाहीत, त्यांच्या घरी भेट देऊन त्या नोंदवल्या जात असल्याचं ते म्हणाले. मुंबईतल्या सर्व ६ मतदार संघांमध्ये येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'ईशान्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात पत्र्याचं होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा १४ वर पोहोचला आहे, तर ४३ जण जखमी झाले आहेत. काल संध्याकाळी आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे छेडानगर जंक्शन इथल्या एका पेट्रोल पंप जवळच्या १०० फूट उंच होर्डिंगचे खांब उखडले गेले आणि ते पेट्रोल पंप आणि जवळच्या वस्तीवर कोसळलं. दुर्घटना स्थळी एनडीआरएफ, पोलीस, सीआरपीएफ, आणि अग्निशमन दलाचे जवान बचाव कार्य करत आहेत. या होर्डींच्या खाली अजूनही अनेक गाड्या अडकल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल अपघात स्थळी भेट दिली. अपघातातल्या मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी ५ लाख रुपये मदत जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचं ते यावेळी म्हणाले. या दुर्घटनेसाठी जबाबदार व्यक्तीं विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशांतर्गत कोळसा साठ्यामध्ये यंदा २६ टक्के वाढ झाली असून, तो १४९ दशलक्ष टन वर पोहोचल्याचं कोळसा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. यंदाच्या एप्रिल महिन्यात देशाच्या कोळसा उत्पादनात ७ पूर्णांक ३१ शतांश टक्के वाढ झाल्याचं तसंच ऊर्जा क्षेत्राच्या कोळसा पुरवठ्यामध्ये दर वर्षी ५ पूर्णांक ४३ शतांश टक्के वाढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. येत्या जून महिन्यातल्या विजेच्या सर्वोच्च मागणीची पूर्तता करण्यासाठी देश सज्ज असल्याचंही त्यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

रामचरितमानस, पंचतंत्र आणि सहृदयलोक-लोकाणा या ग्रंथांची नोंद युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ वर्ल्ड आशिया पॅसिफिक रिजनल रजिस्टरमध्ये झाली आहे. आशिया-

प्रशांत महासागर विभागाच्या ऐतिहासिक स्मृतींचं जतन करण्यासंदर्भात जागतिक समितीची दहावी बैठक नुकतीच मलेशियातल्या उलनबत्तर इथं झाली. या बैठकीत इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राने भारताच्या या तीनही नामांकनांची योग्यता यशस्वीपणे मांडली. गोस्वामी तुलसीदास यांचं रामचरितमानस, विष्णुशर्मा लिखित पंचतंत्र आणि आनंदवर्धन कृत सहृदयलोक-लोकाणा या ग्रंथांचं महत्व कालातीत असून, भारताच्या साहित्य आणि परंपरेच्या समृद्धतेची ही पावती आहे, असं सांस्कृतिक मंत्रालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयानं आज जामीन मंजूर केला. नवलखा हे चार वर्षांपासून कैदेत होते. या प्रकरणी अद्याप त्यांच्यावर आरोपही निश्चित झालेले नाहीत. या प्रकरणाची सुनावणी आणखी लांबणार असल्याचं मत नोंदवत न्यायलयानं हा जामीन मंजूर केला. गौतम नवलखा यांना त्यांच्या घरीच झालेल्या नजरकैदेच्या सुरक्षेसाठीचा वीस लाख रुपयांचा खर्च भरण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या पूर्व समुद्रातल्या ताफ्यानं आपल्या मलेशिया भेटी दरम्यान आज कोटा किनाबलू इथं रॉयल मलेशियन नेव्ही बरोबर सागरी भागीदारी सराव केला आणि सामुदायिक उपक्रमांमध्ये भाग घेतला. आयएनएस दिल्ली आणि आयएनएस शक्ती सह भारतीय नौदलाच्या इतर नौकांचा यामध्ये समावेश होता. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्याला प्रोत्साहन देणं, द्विपक्षीय संबंध मजबूत करणं आणि देशाच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाप्रति भारतीय नौदलाची वचनबद्धता प्रदर्शित करणं, हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**//<><><><><>//**